बीड (महाराष्ट्र) । सायं.दैनिक । मराठी । वर्ष – ०३ । अंक – ०२ । वार रविवार दि २८ सप्टेंबर एमएचएमएआर /२०२३/८३९६५ । किंमत ३ रू. । पाने ४
Beed (Maharashtra) Daily Evening Marathi n Year - 03 Issue - 02 Sunday 28 September 2025 RNI : MAHMAR/2023/83965 Price - 3 Rupees Pages 4

# बीड पोलिसांची बंद खोलीतून गुन्हेगारांशी हातमिळवणी ? एसपी कॉवत यांच्या काळात कायदा आणि सुव्यवस्थेचे तीन तेरा वाजले, नागरिकांमध्ये संतापाचा ज्वालामुखी !

गुन्हा दाखल होण्यापूर्वी ठाण्यात येऊन प्रकरण मिटवण्याचा प्रयत्न करणारा लक्ष्मण बेडसकर पोलीस ठाण्यातून फरार होतोच कसा ?

सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक :– दिपक थोरात मो.९८६०८९८५६४

आरोपी बेडसकर पोलीस ठाण्यामध्ये खुर्चीवर बसलेला व्हिडिओ आणि फोटो व्हायरल झालेले आहेत यावर पोलीस निरीक्षक स्वप्निल उनवणेंनी स्पष्टीकरण द्यावे ?

## एसपी कॉवत साहेब, तुमच्या जिल्ह्यात गुन्हेगार राज करतायत, तुमचा कर्तव्यदक्षपणा आता फक्त नावालाच उरलाय, दिवसाढवळ्या लोकांचे मुडदे पडत आहेत?

## पत्रकाराच्या मुलाचा खूनही रोखू न शकणारे पोलिस गुन्हेगारांना हाताशी धरून बसले ; गुन्हेगारांच्या बगलबच्च्यांसमोर पोलीस यंत्रणा गप्प का ?

## विनयभंग व पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल झालेला आरोपी बेडसकरांना फरार करण्यात केज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक स्वप्निल उनवणेंचा हात ?





बीड (प्रतिनिधी):– बीड जिल्ह्यात कायदा आणि सुव्यवस्थेची मुळं हादरवणाऱ्या गंभीर घटनांची मालिकाच सुरू असून पोलिस प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. विनयभंग आणि पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल झालेला आरोपी लक्ष्मण बेडसकर याला पळवून लावण्यात केज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक स्वप्निल उनवणे यांचाच हात असल्याची चर्चा आता जिल्हाभर जोरदार रंगत आहे. गुन्हा दाखल होण्यापूर्वीच ठाण्यात येऊन प्रकरण मिटवण्याचा प्रयत्न करणारा आरोपी ठाण्यातून फरार कसा झाला, हा लाखमोलाचा प्रश्न आहे. त्याचबरोबर आरोपी ठाण्यात बसलेला व्हिडिओ आणि फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले असून, यावर पोलीस निरीक्षक उनवणे यांनी जनतेसमोर स्पष्टोक्ती द्यावी अशी मागणी होत आहे.

दरम्यान, जिल्ह्यातील पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्या कार्यक्षमतेवरही जनतेतून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. ते रुजू झाल्यानंतर गुन्हेगारी रोखण्यासाठी मोकोका, तडीपार, एमपीडी अशा कारवाया केल्या तरीही दोन महिन्यांत दिवसाढवळ्या दहा ते पंधरा खून झाले आहेत. गुन्हेगार टोळ्या, राजकीय नेत्यांचे बगलबच्चे, तरुणांच्या गँग, तसेच सोशल मीडियावरून जातीय तेढ निर्माण करणारे मोकाट फिरत आहेत. लोकशाहीचा चौथा स्तंभ मानल्या जाणाऱ्या पत्रकाराच्या मुलाची हत्या पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या केवळ ५०० मीटर अंतरावर होते, हत्यारे फरार होतात, आणि जखमी युवकाला तब्बल अर्धा तास रस्त्यावर पडून राहावे लागते हे दुर्दैव आणि पोलिसांच्या कार्यक्षमतेवर थेट प्रश्नचिन्ह आहे. बीड सिटीझनचे उपसंपादक देवेंद्र ढाका यांच्या मुलाची हत्या ही त्याचेच ठळक उदाहरण आहे. जिल्ह्यातील पत्रकारांचा आणि नागरिकांचा एकमुखी सूर आहे. गुन्हेगारांना संरक्षण देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, आरोपींना तात्काळ अटक करून कायदेशीर कठोर शिक्षा व्हावी, राजकीय हस्तक्षेपाला शरण गेलेल्या पोलिस यंत्रणेला शिस्तीत आणावे सध्या बीड जिल्ह्यात कायदा आणि सुव्यवस्थेचा तीन तेरा वाजला असून गुंडागर्दीचे खुलेआम नंगानाच सुरू आहेत. नागरिकांचा एकच सवाल आहे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्या काळात गुंडागिरीवर





लगाम लागणार की जिल्हा दिवसेंदिवस गुन्हेगारांचा स्वर्ग ठरणार? पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांचे कर्तव्य अतिशय चांगल्या प्रकारे आहे. परंतु त्यांच्या खालची जी त्यांची पोलीस यंत्रणा आहे ती मात्र कुठेतरी कमी पडत आहे. कायदा व सुव्यवस्था दाखवण्यामध्ये ते व्यवस्थित काम करत नसल्यामुळे हे सर्व प्रकार घडत असल्याचे बीड जिल्ह्यातील नागरिकांमध्ये बोलले जात आहे.

## शेतकऱ्यांना मदत होणार; पण भूमिहीन लोकांचं काय ? ;भूमिहीन लोकांना देखील सरकार ने मदत करावी- उजगरे

बीड : दरवर्षी अतिवृष्टी, दुष्काळ किंवा नैसर्गिक आपत्ती आल्या की सरकार शेतकऱ्यांना मदतीची घोषणा करते. मात्र, ही मदत केवळ जमीनधारक शेतकऱ्यांच्या पोटापुरती मर्यादित असते. भूमिहीन मजूर, शेतमजूर, दैनंदिन कामगार यांच्या परिस्थितीबाबत सरकार कायम मौन बाळगते. सरकार शेतकऱ्यांना मदत करेल हो, पण भूमिहीन लोकांचं काय? असा थेट सवाल वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश उजगरे यांनी केला आहे. भूमिहीन मजुरांवर सर्वाधिक परिणाम ग्रामीण भागात शेतमजुरी, वीटभट्टी, बांधकाम वा दैनंदिन मजुरीवर अवलंबून असलेला मोठा वर्ग भूमिहीन आहे. पाऊस, पूर किंवा दुष्काळ आल्यास त्यांच्या रोजीरोटीलाच तडा जातो. उजगरे म्हणाले, हे लोक नुसते हातावर पोट भरणारे आहेत. शेतकऱ्यांना मदत झाली तरी मजूर बेरोजगार होतो. मग त्याला आधार कुठून मिळणार?

सरकारची भूमिहीनांकडे दुर्लक्ष सरकारची सध्याची मदत धोरणे अपुरी असून केवळ जमीनधारक शेतकऱ्यांपुरती मर्यादित आहेत. भूमिहीन मजुरांसाठी ना तातडीची आर्थिक मदत, ना रोजगार हमी योजनेत वाढ, ना मोफत धान्याचा पुरेसा पुरवठा होत असल्याची टीका उजगरे यांनी केली. मागण्या उजगरे यांनी स्पष्ट केले की, भूमिहीन मजुरांना तातडीची रोख मदत द्यावी. मोफत धान्य व जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा वाढवावा.झोपडपट्ट्या वा कच्ची घरे नुकसानग्रस्त झाल्यास घरकुल योजना तत्काळ लागू करावी. सरकारविरोधात संताप फक्त शेतकऱ्यांना मदत करून सरकारने जबाबदारी पूर्ण केली असे समजणे ही भूमिहीनांच्या अन्यायाची परिसीमा आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेत मजुरांचाही तेवढाच वाटा आहे, हे सरकारने लक्षात घेतले पाहिजे. अन्यथा भूमिहीनांच्या उद्रेकाला सरकार जबाबदार असेल. असा इशाराही प्रकाश उजगरे यांनी दिला.



## संपादकीय...

## भारत विरुद्ध इंडिया; शहरी–ग्रामीण विषमतेचा अर्थ आणि परिणाम काय?

महाराष्ट्राच्या मातीत गेल्या काही दिवसांत एक परस्परविरोधी चित्र उभे ठाकले आहे. एकीकडे अतिवृष्टी, ढगफुटी आणि मुसळधार पावसामुळे खरीप पिकांचे, फळबागांचे, रस्त्यांचे आणि घरांचे झालेले प्रचंड नुकसान–शेतकऱ्यांच्या डोळ्यांत भविष्याची काळजी, तर दुसरीकडे मुंबई–पुण्यासारख्या शहरांत पलच्या नव्या आयफोनसाठी तरुणाईची झुंबड. एक समाज निसर्गावर पूर्णतः अवलंबून; दुसरा जागतिकीकरणाच्या फळांचा उपभोग घेणारा. हीच ती आहे रे आणि नाही रे वर्गातील दरी, म्हणजेच भारत विरुद्ध इंडिया!

आमच्या न्यूजलेटरसाठी साईन–अप करा आयफोन खरेदी करणाऱ्या तरुणाईची झुंबड आणि नैसर्गिक आपत्तीत उद्ध्वस्त झालेला शेतकरी–ही तुलना विसंगत भासू शकते. आयटी क्षेत्रातील तंत्रज्ञ तरुणांनी बौद्धिक क्षमतेच्या जोरावर जग जिंकले, हे अभिमानाचेच आहे. पण लाखो तरुणांच्या हाताला आजही काम नाही. नोकऱ्यांचे दरवाजे बंद होत चाललेत, आरक्षणाच्या मोर्चांत वाढणारी गर्दी हा केवळ जातीय आग्रह नव्हे, तर रोजगाराच्या टंचाईतून आलेला उद्वेग आहे. संविधानात 'इंडिया इज भारत' असे म्हटले आहे. दोन नावांची ही मांडणी आपल्याला एकात्मतेची शिकवण देते; परंतु वास्तवात आपण पाहतो ते वेगळेच चित्र आहे. देश दोन तुकड्यांत विभागल्यासारखा दिसतो. एक भाग म्हणजे 'इंडिया' जो आधुनिक, झपाट्याने प्रगती करणारा, जागतिक स्तरावर स्पर्धा करणारा आणि दुसरा भाग म्हणजे 'भारत'; जो गरिबी, विषमता आणि वंचिततेशी झुंज देणारा. भारतातील अर्थव्यवस्था आज जगातील सर्वांत वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक मानली जाते. जीडीपी वाढीचे आकडे झगमगाट दाखवतात, परदेशी गुंतवणूक वाढते, नवे उद्योग उभे राहतात. एकीकडे तंत्रज्ञान, अर्थव्यवस्था आणि शिक्षणात झपाट्याने प्रगती करणारा 'इंडिया', तर दुसरीकडे कष्टकरी, शेतकरी, मजूर आणि उपेक्षित वर्गांच्या संघर्षात अडकलेला भारत! शेअर बाजारात रोज नवे विक्रम नोंदवले जातात. शहरातील मॉल, मेट्रो, आलिशान सोसायट्या आणि स्टार्टअप्समध्ये 'इंडिया' तेजाने झळकतो; परंतु त्याच वेळी गावातल्या शेतकऱ्याला पिकाला भाव मिळत नाही, युवकांच्या हाताला काम नाही. इंडियातील काही टक्के लोकांच्या हातात प्रचंड संपत्ती; जागतिक दर्जाचे उद्योगपती, डॉलर अब्जाधीशांची संख्या वाढते आहे, तर भारतातील अर्ध्याहून अधिक लोक अजूनही पोटापाण्यासाठी धडपडत आहेत. ग्रामीण अर्थव्यवस्था निसर्गाच्या चक्रात अडकली आहे. 'इंडिया'तील उच्चवर्गीय समाजाची जीवनशैली पाश्चिमात्य जगाशी स्पर्धा करणारी आहे. मॉल, मल्टिप्लेक्स, डिजिटल पेमेंट, परदेश प्रवास ही रोजची गोष्ट; परंतु 'भारत' अजूनही पायाभूत सुविधांपासून वंचित आहे. गावात अजून रस्ते नाहीत, पिण्याच्या पाण्याची टंचाई आहे, आरोग्यसेवा पोहोचत नाही. ही विषमता फक्त आर्थिक नाही, तर सामाजिक स्तरही दर्शविते. शिक्षण हा समाज परिवर्तनाचा पाया आहे. पण इथेही भारत विरुद्ध इंडिया हेच चित्र आहे. इंडियातील विद्यार्थी इंग्रजी माध्यमांच्या शाळेत, आंतरराष्ट्रीय शाळेत, आयआयटी–आयआयएम, परदेशी विद्यापीठांची स्वप्नं पाहाणारे, तर ग्रामीण भारतातील जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षक नाहीत, साधने नाहीत. इंडिया तंत्रज्ञानात '–ख' वापरतो, तर भारत अजूनही वीजपुरवठ्यासाठी झगडतो. समाजातील ही आर्थिक दरी वाढत गेली, तर ग्रामीण–शहरी संघर्ष अटळ आहे.

इंडियाची 'ब्रँडेड' धावपळ

भारत हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा स्मार्टफोन बाजार आहे. २०२४ मध्ये पलने भारतात ८५ लाख आयफोनची विक्री केली. पलची भारतातील विक्री जवळपास ९ अब्ज डॉलर्सच्या विक्रमी पातळीवर पोहोचली आहे.

महाराष्ट्राच्या मातीत गेल्या काही दिवसांत एक परस्परविरोधी चित्र उभे ठाकले आहे. एकीकडे अतिवृष्टी, ढगफुटी आणि मुसळधार पावसामुळे खरीप पिकांचे, फळबागांचे, रस्त्यांचे आणि घरांचे झालेले प्रचंड नुकसान–शेतकऱ्यांच्या डोळ्यांत भविष्याची काळजी, तर दुसरीकडे मुंबई–पुण्यासारख्या शहरांत पलच्या नव्या आयफोनसाठी तरुणाईची झुंबड. एक समाज निसर्गावर पूर्णतः अवलंबून; दुसरा जागतिकीकरणाच्या फळांचा उपभोग घेणारा. हीच ती आहे रे आणि नाही रे वर्गातील दरी, म्हणजेच भारत विरुद्ध इंडिया!

आमच्या न्यूजलेटरसाठी साईन–अप करा आयफोन खरेदी करणाऱ्या तरुणाईची झुंबड आणि नैसर्गिक आपत्तीत उद्ध्वस्त झालेला शेतकरी–ही तुलना विसंगत भासू शकते. आयटी क्षेत्रातील तंत्रज्ञ तरुणांनी बौद्धिक क्षमतेच्या जोरावर जग जिंकले, हे अभिमानाचेच आहे. पण लाखो तरुणांच्या हाताला आजही काम नाही. नोकऱ्यांचे दरवाजे बंद होत चाललेत, आरक्षणाच्या मोर्चांत वाढणारी गर्दी हा केवळ जातीय आग्रह नव्हे, तर रोजगाराच्या टंचाईतून आलेला उद्वेग आहे. संविधानात 'इंडिया इज भारत' असे म्हटले आहे. दोन नावांची ही मांडणी आपल्याला एकात्मतेची शिकवण देते; परंतु वास्तवात आपण पाहतो ते वेगळेच चित्र आहे. देश दोन तुकड्यांत विभागल्यासारखा दिसतो. एक भाग म्हणजे 'इंडिया' जो आधुनिक, झपाट्याने प्रगती करणारा, जागतिक स्तरावर स्पर्धा करणारा आणि दुसरा भाग म्हणजे 'भारत'; जो गरिबी, विषमता आणि वंचिततेशी झुंज देणारा. भारतातील अर्थव्यवस्था आज जगातील सर्वांत वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक मानली जाते.

# माती माणसांचा काळजीवाहू सलोखानायक भागवत तावरे आणि आपत्ती एक जोडबंद

लोकपत्रकार भागवत तावरे म्हणजे सर्व जाती धर्मांना घेऊन चालणारा आपल्या ग्रामीण भागातून शहरी भागात येऊन पत्रकारीतिला सुरुवात करणारा भागवत तावरे. गरिब परिस्थितीतून व शेतकरी कुटुंबातून जन्म घेतलेला भागवत तावरे ज्यांनी क्रॉस लाईनच्या माध्यमातून अनेक गोरगरिबांना न्याय मिळवून देण्याचे कार्य केलेले आहे त्याच कार्याच्या पावलावर पाऊल ठेवून राजकीय क्षेत्रात त्यांनी पाऊल ठेवले विधानसभा निवडणुकीत त्यांनी बीड शहरातून निवडणूक लढविण्याची मानस केले परंतु निवडणुकीत त्यांना मतदान रुपी आशीर्वाद कमी पडले परंतु तिथे न खस्ता न घाबरता न कोणावर राग ठेवता त्यांनी पुढे एक पाऊल टाकण्याचे पुन्हा एकदा धाडीस केले व विधानसभा निवडणूक झाल्यानंतर त्यांनी केलेल्या कामाची पावती म्हणून गोरगरिबात च्या घरापर्यंत जाऊन अनेकांचे अडीअडचणी दूर करण्याचे मानस ठेवले त्याची दखल घेत मित्रपणा कायम ठेवणारे माजी पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी दोस्तीतला राजा माणूस म्हणून त्यांना जवळ केले व त्यांना राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे प्रवक्तपदी विराजमान केले .आज राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे प्रवक्ते म्हणून त्यांची महाराष्ट्रात ओळख निर्माण झाली. ओळखतो ते आदुगरच



कोरस लाईनच्या माध्यमातून त्यांनी निर्माण केली होती परंतु एक त्यांना एक व्यासपीठ भेटलं आज ते राजकारणाच्या माध्यमातून गोरगरिबांना त्याचा फायदा कसा होईल व त्यांना मदत कशी होईल याची मानसिकता ठेवून एक पाऊल पुढे टाकताना चित्र दिसत आहे.भागवत तावरे यांनी कोरोनाच्या काळात भाऊ भाऊला भेटत नव्हता नातेगोते तुटले होते परंतु कुणीही रोडवर याला तयार नव्हता त्यावेळेस त्यांनी अनेकांना मदत करण्याचे धाडस केले व आरोग्य यंत्रणा त्यांनी पुरापूर सांभाळली त्याचबरोबर त्यांनी अन्न वस्त्र निवाराचे नियोजन केले होते आज तसाच अवतार रूप पावसाने अहंकार केला आहे गोरगरिबांचे घरात पाणी घुसले अनेकांचे संसार उध्वस्त झाले शेतकऱ्यांचा आज तोंडा घासी आलेला घास हिरवला त्यांना एक मदतीचा हात म्हणून पुन्हा एकदा लोक पत्रकार तथा राष्ट्रवादी प्रवक्ते भागवत तावरे पुन्हा मैदानात उतरले प्रत्येक अपडेटची पोस्ट फेसबुकच्या माध्यमातून मिनिटमिंटाला आज ते पोस्ट करत आहे. व अनेकांची समस्या जाणून घेत आहे खरोखरच भागवत तावरे म्हणजे रक्तातला नातं नसलं तरी कधी कोणाला पर्क समजलं नाही अशी त्यांची सध्याचे परिस्थितीमध्ये चित्र पाहायला मिळत आहे.मी स्वतः कोरोनाच्या काळात रात्रीचे तीन वाजता एका रुग्णांचे संदर्भात फोन केला भागवत तावरेने एक रिंग मध्ये कॉल उचलला बोला अल्ताफ भाई काय झालं मी म्हणलं साहेब एक जणाला ऑक्सिजन कमी पडत आहे तुम्ही काळजी करू नका त्या व्यक्तीच्या नातेवाईकाला कॉल जोडा भागवत तावरे यांनी रुग्णांच्या नातेवाइका सोबत बोलले व अवगत पाच मिनिटात ऑक्सिजन सिलेंडर तिथे पोहोचले असेच फोन मी भागवतराव आगोदर लोकप्रतिनिधीला दोन ते तीन जणांना लावले परंतु त्यांनी एकही कॉल रात्रीचे वेळ उचलला नाही. मंग लोकप्रतिनिधी पेक्षा मोठा भागवत तावरेच आहे. असा मी विश्वास ठेवला तेव्हापासून आजपर्यंत कोणत्याही संकटात भागवतावरे यांना मी फोन केला तर तात्काळ ते प्रश्न त्यांनी सॉल केला आज पावसाचे अहंकारात अनेक कुटुंब संसार उध्वस्त झाल्याचे चित्र पाहावेत मिळत आहे व शेतकरी बांधव मोठ्या संकटात सापडला आहे या संकटात भागवत तावरे सुद्धा मदत करताना दिसत आहे व त्यांचे सहकार्यासोबत ते जिओ जिंदगीच्या माध्यमातून अनेकांना मदत करताना पाहावयास मिळत आहे भागवतराव तुमच्या कार्याला कोटी कोटी सलाम पुढील आयुष्य भरभराटीचे जावो हीच आल्हा,ईश्वर, चरणी प्रार्थना करतो



शब्द संकलन

**पत्रकार आल्ताफ कुरेशी**

मुपो तलवाडा तालुका गेवराई जि बीड



**बीड:– आज सकाळी १० वाजता मागील एक आठवड्यापासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे बीड शहरातील जुना बाजार. कमवाडा. हाती खाना. किल्ला वेस खंदक.आलेल्या पावसामुळे बरेच ठिकाणी घराचे भिंत पडले म्हणून आज जिल्हाधिकारी कार्यालयातील प्रशासकीय अधिकारी शब्बीर भाई पठाण यांना बोलून समाजसेवक व भाजपचे नेते मुसाखान पठाण व नगरसेवक जैतुल्ला खान पठाण आणि माजी सभापती मुखीद लाला यांनी घराचे पंचनामे करून शासनातर्फे लवकरात लवकर नुकसान भरपाई मिळून द्यावी ह्यासाठी प्रयत्न केले...**

## अतिवृष्टी झालेल्या भागात मुस्लिम सेवा संघ कडून मदतीचा हात

**बीड – मुस्लिम सेवा संघ महाराष्ट्र तर्फे आदरणीय राष्ट्रीय अध्यक्ष फेरोझ भैय्या मसुलदार यांच्या आदेशाने, जिल्ह्यात अतिवृष्टी होऊन नुकसान झालेल्या भागाची पाहणी करून नागरिकांच्या अडीअडचणी जाणून घेऊन त्यांना कपडे अन्नधान्य व इतर अत्यावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले.यावेळी मुस्लिम सेवा संघाच्या टीमचे महाराष्ट्र राज्य सचिव फिरदोस सर, बीड जिल्हा उपाध्यक्ष माजी नगरसेवक फारूक मणियार सर, तालुका अध्यक्ष रियाज सिद्दिकी सर कृषी विभाग जिल्हा प्रतिनिधी, पत्रकार फहीम इनामदार सर, तसेच तालुका अध्यक्षा शाझिया शेख, शहराध्यक्ष शिरीन शेख, मुमताज मॅडम इत्यादीने वाटप केले तसेच ही टीम लवकरात लवकर जिल्हाधिकारी आणि तहसीलदार यांना निवेदन देऊन अतिवृष्ट ग्रस्त भागाची पाहणी करून त्यांचा पंचनामा व त्यांना योग्य ते नुकसान भरपाई मिळावी तसेच रस्ते नाल्यांचे काम त्वरित करण्यात यावे यासंबंधी निवेदन देणार आहेत.**



पान ४ वरून..

### होणारा ओबीसी महाएल्गार मेळावा पुढे ढकलला!-ॲड. सुभाष राऊत

साहेब यांनी केले आहे. यामुळे आज रविवार दिनांक २८ सप्टेंबर २०२५ रोजी चा बीड येथे आयोजित केलेला ओबीसी महाएल्गार मेळावा पुढे ढकलण्यात आला असून लवकरच मेळाव्याची तारीख जाहीर केली जाईल असे मेळाव्याचे आयोजक तथा अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस ड. सुभाष राऊत यांनी कळविले आहे.

-------------------

### ओबीसी आरक्षण संपलं: आता पोलीस भरतीत माझी मुलं लागत नाहीत

दिवसापासून त्यांनी या गोष्टीचा अतिविचार केला. तीन–चार दिवसापासून ते गप्प गप्प राहू लागले होते. तुम्ही का बोलत नाही? असे मुलांनी व घरच्यांनी विचारले. त्यावेळीही त्यांनी याबाबत काही उत्तर दिले नाही. त्यानंतर अधिक आग्रहाने विचारल्यानंतर त्यांनी सांगितले की, तुम्ही मुलांनी आता काहीतरी कामधंदे बघा, आता आपल्याला नोकऱ्या लागणे शक्य नाही. आपले आरक्षण संपून गेले आहे .यानंतर त्यांची पत्नी व मुलांनी त्यांना समजावूनही सांगितले होते. परंतु त्यांच्या डोक्यातून आरक्षण संपले हा विषय निघाला नाही. त्यांनी आपल्या एका चुलत भावाजवळ याबाबतची खंत बोलून दाखवली. माझ्या मुलांचे आयुष्य पण माझ्यासारखच ऑटो चालवून जाईल. आपल्याकडे काही संपत्ती, शेती नाही. आता आपलं ओबीसीचे आरक्षण पण संपलेले आहे. त्यामुळे माझी मुलं काही नोकरीला लागत नाहीत अशा प्रकारची चिंता व्यक्त करून दाखवली होती. याच विचारात ग्रासलेले असताना आत्माराम भांगे यांचा मुलगा व पत्नी शेतातील आखाड्यावर दूध काढण्यासाठी गेले असताना त्यांनी घरातील एका रूममध्ये साडीचा गळफास घेऊन आत्महत्या केली. पत्नी व मुलगा घरी परत आल्यानंतर ही बाब त्यांच्या निदर्शनास आली. ओबीसी आरक्षण संपल्याच्या धक्क्यातूनच आपल्या वडिलांनी आत्महत्या केल्याची हकीकत त्यांच्या मुलाने परळी ग्रामीण पोलिसात नोंदवली आहे. त्याचप्रमाणे त्यांच्या खिशात आपले ओबीसी आरक्षण संपले म्हणून मी आत्महत्या करीत आहे अशा प्रकारची चिठ्ठीही आढळून आली आहे. त्यानुसार अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे .अधिक तपास परळी ग्रामीण पोलीस करीत आहेत.

-------------------

### डा.सारिकाताई क्षिरसागरानी पावसाचे पाणी घरात असल्यामुळे पन्नास घरांना दिली भेट-विनोद हातागळे

उपस्थितीत मंडळ अधिकारी अनिल तांदळे यांनी केली असून त्या भागातील ३३ घरांच्या नुकसानीचे पंचनामे केले आहेत. दरम्यान, दिवसभर वैयक्तिक आणि प्रशासकीय पातळीवर डॉ.सारिका क्षीरसागर यांचे मदत कार्य सुरू होते.

जालना रोडलगतच्या नालीची समस्या

ना.अजित पवार यांच्याकडे मांडणार

बीड शहरातील जालना रोड भागातील सर्व दुकानांमध्ये पाणी शिरल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. तत्काळ घटनास्थळी जाऊन मुख्याधिकाऱ्यांशी संपर्क साधून आवश्यक उपाययोजना करण्यास सांगितले. याठिकाणी वारंवार पाणी साचत असल्याने कायमस्वरूपी तोडगा निघावा यासाठी पालकमंत्री ना.अजित पवार यांना कळविण्यात येणार आहे.

पांगरी रोड भागातील वीजपुरवठा सुरळीत करण्याचे काम सुरू

पांगरी रोड भागातील विद्युत खांब व तारा वाकल्याने वीजपुरवठा खंडित झाला होता. डॉ.सारिका क्षीरसागर यांनी महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांना तातडीने काम सुरू करण्याच्या सूचना दिल्या असून, वीजपुरवठा सुरळीत करण्याचे काम सुरू झाले.

नागरिकांसाठी हेल्पलाइन जारी

आपत्कालीन परिस्थितीत तातडीने मदत मिळावी यासाठी डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या संपर्क कार्यालयातून हेल्पलाइन सुरू करण्यात आली आहे. ग्रामीण भागासाठी ९६२३८७७५९९ व ७३५०५१०००९ आणि शहरी भागासाठी ९४२२६१६६६२, ८०८७५०८२६७, ८९९९९२९२८० या हेल्पलाइन नंबरवर किंवा जिल्हा प्रशासनाच्या आपत्कालीन क्रमांक ०२४४२–२९९२९९ यावर संपर्क करावा, असे आवाहन राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले आहे.

-----------------

### शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी करून

नाही. त्यांनी पुढे सांगितले की, शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवायच्या असतील तर सरकारने कागदोपत्री घोषणांवर न थांबता प्रत्यक्ष निर्णय घ्यावा. शेतकरी जगला तरच ग्रामीण अर्थव्यवस्था उभी राहील आणि देश मजबूत होईल. त्यामुळे सरकारने तात्काळ निर्णय घेऊन शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहणे हीच काळाची गरज आहे, असेही डांगे यांनी स्पष्ट केले. शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने मदतीचा निर्णय घ्यावा, अशी मागणी करत त्यांनी प्रशासनासह राज्य सरकारला याबाबत ठोस पावले उचलण्याचे आवाहन केले आहे.

-----------------

### धोंडराई बसस्थानकात प्रवाशांची

खात्याने पुढील तीन चार दिवसांत जोरदार पावसाची शक्यता वर्तवली आहे. दिनांक २६,२८ सप्टेंबर रोजी दुपारनंतरसुद्धा वेगवान वारे आणि मुसळधार पाऊस पडला. मुसळधार पावसाने अनेक सखल भागात मोठ्या प्रमाणात पाऊस पडला आहे. मुसळधार पावसाने अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात पाणी साचले. धोंडराई बसस्थानक आणि आगारातसुद्धा मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते. पाऊस सुरूच असल्याने व पाणी वाढत असल्याने चिंतेची बाब निर्माण झाली असून त्यामुळे बसने प्रवास करणारे अनेक प्रवासी व विद्यार्थी यांचे हाल झाले. जोरदार पाऊस पडत असल्याने खाजगी वाहने मिळणेसुद्धा अवघड झाले होते. त्यामुळे बसची वाट पाहणाऱ्या प्रवाशांना मिळेल त्या साधनाने प्रवास करत घर गाठावे लागले. बस स्थानकात पाणी साचले आहे.

-------------------

### सतत तोंडी पाठपुरावा करून देखील जातीय द्वेष भावनेतून दलित वस्तीतील समस्या

डोळे झाक करणाऱ्या सरपंच, ग्रामसेवक यांच्यावर कारवाईची मागणी डॉं. रंजीत कसबे यानी गट विकास अधिकारी यांच्या कडे निवेदनाद्वारे केली आहे.

गावात दुर्गंधीचे प्रमाण खूप मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे याची तक्रार तोंडी स्वरूपात ग्रामपंचायतला करून देखील ग्रामपंचायत याकडे दुर्लक्ष करत आहे मी सरपंच , ग्रामसेवक यांची तक्रार गटविकास अधिकारी यांच्या कडे करत आहे जर या तक्रारीचे दखल घेण्यात आली नाही तर रीतसर पत्रव्यवहार करून गटविकास अधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करणार..

डॉ. रंजीत कसबे
ग्रामस्थ कल्याण नगर वस्ती
ग्रामपंचायत शिंपे टाकळी

-------------------

### व्यंकटेश पब्लिक स्कूल मधील प्रवेश

तुम्हाला घ्यावा लागेल आमच्याच वाहनातून तुमच्या विद्यार्थ्यांची ये जा (प्रवास) करावी लागेल असा रजाकारी कायदा व्यंकटेश पब्लिक स्कूल राबवताना दिसत आहे शाळेत कसल्याच प्रकारचा शैक्षणिक दर्जा नसल्यामुळे येथील विद्यार्थी शाळा सोडून जाऊ लागले आहेत त्यामुळे हवालदिल झालेल्या व्यंकटेश पब्लिक स्कूलच्या संचालकाकडून मुलांच्या पालकांचा व विद्यार्थ्यांचा छळ करण्यात येत आहे, आमची शाळा सोडली का? असा प्रश्न विचारून मी तुमच्या मुलाचा टीसी देत नाही काय करायचे ते करा अशी भाषा संस्थाचालक वापरत आहेत या इंग्लिश स्कूलच्या आडमुठ्या धोरणामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे ग्रामीण भागातील शेतकरी अडचणीत अस्मानी संकटात असताना शाळा व्यवस्थापनाकडून अतिरिक्त शुल्क वसुली, दडपशाही पद्धतीने पालकांवर दबाव आणणे तसेच मुलांना मानसिक त्रास दिला जात असल्याचे बोलले जात आहे. शेतकरी कुटुंबे आधीच नैसर्गिक संकटे, कर्जबाजारीपणा व आर्थिक संकटास सामोरे जात आहेत. त्यातच शिक्षणाच्या नावाखाली मनमानी शुल्कवाढ आणि लहान–सहान कारणांवर विद्यार्थ्यांना शिक्षा करण्याच्या तक्रारीमुळे पालकांत नाराजी व्यक्त होत आहे. शेतकरी मुलांना शिक्षणापासून वंचित करण्याचा हा प्रकार असून, प्रशासनाने याबाबत तातडीने चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी पालक व स्थानिक नागरिकांनी केली आहे. दरम्यान, या प्रकरणाबाबत संबंधित शाळा प्रशासनाशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला असता कोणतीही ठोस भूमिका मिळाली नाही. मात्र शेतकरी पालकांचा रोष दिवसेंदिवस वाढत असून लवकरच एका विद्यार्थ्याचे पालक आणि कुटुंबीय आमच्या मुलाचा टीसी द्या या न्याय मागणीसाठी लवकरच जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने उपोषण करणार असल्याची ही माहिती मिळत आहे त्यामुळे धंदेवाईकांचे रखेल झालेल्या शिक्षण प्रशासनाने आता तरी खडबडून जागे व्हावे अन्यथा खूप मोठ्या संकटाला सामोरे जावे लागण्याची शक्यता आहे

-------------------

### धानोरा रोड नागरिकांच्या संघर्षामुळेच रस्त्यासाठी तीन कोटी मंजूर : सचिन मुळूक

देखील जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढून आपल्या व्यथा मांडल्या. पावसाळ्यात या रस्त्यावर ठिकठिकाणी पाणी साचत असे. अनेक अपघात घडले. यामुळे नागरिकांचा त्रास अधिकच वाढला.आता शासनाने मंजूर केलेल्या तीन कोटी रुपयांच्या निधीतून धानोरा रोडचे सिमेंट कॉंक्रीटीकरण होणार आहे. यामुळे रस्त्याची टिकाऊपणा वाढेल व नागरिकांना दीर्घकाळ दिलश्न

-------------------

### मराठवाड्यात ओला दुष्काळ

वेळेवर पेरणी करून त्या पिकांची मशागत करत पिके कधी नव्हे ती जोमात आली होती. परंतु मागील आठवडाभरापासुन मराठवाड्याला मुसळधार पावसाने झोडपल्याने शेतकऱ्यांच्या हातात तोंडाशी आलेले पीक या पावसाने फिरवले आहेत त्यामुळे मराठवाड्यात ओला दुष्काळ जाहीर करून विशेष पॅकेजमधुन मदत देत शेतकऱ्यांना राज्य शासनाने दिलासा द्यावा अशी मागणी बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी नाना मोरे यांनी केले आहे.

# शहरातील धांडे नगर भागात डॉ.योगेश क्षीरसागरांची जिल्हाधिकाऱ्यांसोबत पाहणी

## प्रशासन सक्रिय; विविध भागात नगरपरिषदेची यंत्रणा लावली कामाला



बीड (प्रतिनिधी) शहरातील धांडे नगर भाग संपूर्णतः जलमय झाला असून तेथील पाणी निचऱ्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केली होती. या मागणीवर जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, मुख्याधिकारी शैलेश फडसे, तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्यासह नगरपरिषद प्रशासनाने रविवारी (दि.२८) धांडे नगर परिसराची पाहणी केली. स्थानिक नागरिकांशी संवाद साधून नाल्या तातडीने स्वच्छ करून पाणी निचऱ्यासाठी उपाययोजना करण्याच्या सूचना करण्यात आल्या. यानंतर शहरातील प्रकाश आंबेडकर नगर भागात प्रत्यक्ष पाहणी करून नागरिकांच्या समस्या जाणून घेण्यात आल्या. अनेक घरांमध्ये पाणी शिरल्याने स्वच्छतेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे स्वच्छता मोहीम राबविण्याची सूचना डॉ. क्षीरसागर यांनी प्रशासनाला केली. मुख्याधिकारी शैलेश फडसे यांनी स्वच्छता निरीक्षक व नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांना तत्काळ कामे सुरू ठेवण्याच्या सूचना केल्या. त्यानंतर बार्शी नाका परिसरातील गाडेकर वस्ती येथे भेट देण्यात आली. येथे रस्ता व नालीसंबंधी गंभीर समस्या असल्याचे नागरिकांनी सांगितले. यावर तातडीने तोडगा काढण्याची मागणी स्थानिकांनी केली.

## शेतकऱ्याचे शेत पाण्याने वाहून गेले पीक उध्वस्त झाली मुख्यमंत्री साहेब तात्काळ आर्थिक मदत जाहीर करा-समाजसेवक ढोले पाटील



बीड (प्रतिनिधी):- सध्या चालू असलेल्या मुसळधार पावसामुळे महाराष्ट्रासह मराठवाड्यातील छत्रपती संभाजी नगर विभागातील परभणी बीड नांदेड धाराशिव जालना या जिल्ह्यामध्ये सतत मुसळधार पाऊस चालू आहे याच पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्यामध्ये व बीड शहरांमध्ये देखील मोठा मुसळधार पाऊस सुरू असल्यामुळे बीड शहरातील अनेक भागांमध्ये अनेक गल्ल्याबोळामध्ये अनेक नागरिकांच्या घरात पाणी शिरल्यामुळे अनेकांचे खूप मोठे नुकसान झाले आहे खायचे धान्य वाहून गेले आहेत कोणाचे जनावर शेळ्या वाहून गेल्या आहेत बीड शहरातील नागरिकांना आता खाण्याची देखील पंचायत निर्माण झाली आहे अशा पार्श्वभूमीवर तात्काळ शासनाने उपाययोजना राबवून आता दसरा जवळ आलेला आहे अशा परिस्थितीमध्ये घरामध्ये धान्य राहिलेले नाही म्हणून तात्काळ पुरवठा विभागाच्या माध्यमातून मोफत रेशन उपलब्ध करून शासनाने द्यावे कुठलाही शुल्क रेशन साठी शासनाने स्वीकारू बीड जिल्ह्यातील व बीड शहरातील या मोठ्या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत होऊन दळणवळण विस्कळीत झाले आहे रोज हातावर पोट भरणाऱ्या रोजन रोटी कमावणाऱ्या कामगार मजुराच्या हाताचे काम गेले आहे तसेच नदीला आलेल्या महापुरामुळे शेतकऱ्याची शेती खरडून वाहून गेली तसेच पिकामध्ये पाणी गेले आहे शेतकरी मोठा आर्थिक संकटात सापडला आहे म्हणून महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष मा मुख्यमंत्री देवेंद्र जी फडणवीस साहेब आपण तात्काळ सर्व शेतकऱ्यांना व शेतमजुरांना आर्थिक मदत तात्काळ जाहीर करून तात्काळ शेतकऱ्यांच्या खात्यात व शेतमजुरांच्या खात्यात आर्थिक मदत वर्ग करण्यासाठी प्रयत्न करा शेतकऱ्यांना व शेत मजुरांना कामगारांना दिलासा द्या असे प्रसिद्धी पत्रकाच्या माध्यमातून बीड शहरातील उत्कृष्ट समाजसेवक सर्व लोकांच्या सुखदुःखामध्ये सातत्याने सहभागी होणारे तसेच रुग्णसेवेमध्ये देखील तत्पर असणारे असे लोकशाही पत्रकार संघाचे बीड शहर उपाध्यक्ष व शेतकरी राजा सामाजिक समीती महा राज्य बीड तालुका अध्यक्ष तथा समाजसेवक अशोक दादा ढोले पाटील यांनी प्रसिद्धी पत्रकाच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्य सरकारला विनंती केली आहे .

## नित्रुड परीसरात जनसेवा निसर्गोपचार केंद्र व बोगस मुन्ना भाई डॉक्टरांचा सुळसुळाट

माजलगाव (प्रतिनिधी):- माजलगाव तालुक्यातील खामगाव ते पंढरपूर जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या नित्रुड गावात आणि परीसरात जनसेवा निसर्गोपचार केंद्र हे डॉ सुभाष राठोड यांनी डि एन वाय एस ही पदवी नावापुरती लावुन जनसेवा निसर्गोपचार केंद्र तेलगाव माजलगाव रोडवर टोलेजंग इमारत उभी करून जोरदार पध्दतीने जनसेवा निसर्गोपचार उद्योग सुरू असुन या ठिकाणी डॉ सुभाष राठोड कधीच उपस्थित राहत नसुन या निसर्गोपचार केंद्रामध्ये बाबा नामक इसम कुठलीही पदवी नसताना रूग्णांवर सर्रासपणे उपचार करताना आढळून येतात या राठोड बाबाकडे कोणत्याही विद्यापीठाची पदवी नसुन डॉ सुभाष राठोड यांच्या डि एन वाय एस या पदवीच्या आडुन रुग्णांच्या जिवाशी सर्रासपणे खेळण्याचा प्रकार चालू आहे या निसर्गोपचार केंद्राचे डॉ सुभाष राठोड यांचे दर्शन कधीही घडुन येत नाही या दवाखान्यात असणारे राठोड बाबा नामक इसम हेच मणक्यांचे ग्याप शीर चेक अप हातापायाला मुंग्या येणे मान दुखणे गुडघे दुखणे कंबर दुखणे खुबा दुखणे मालीश करणे या सर्वांचे उपचार सर्रासपणे बिना पदवी वाले राठोड बाबा करताना दिसतात हे बाबा सर्रासपणे रुग्णांच्या जिवीताशी खेळत आहेत महीलाना मालीश करण्यासाठी जमेल त्या ठिकाणी स्पर्श करतो महीलाच्या मालीश साठी महीलाची गरज असते तिथे महीला देखील नाहीयेत या बाबा ला महीलाची मालीश करण्याची कोणी परवानगी दिली याची सखोल चौकशी करून डॉ सुभाष राठोड यांच्या पदवी ची आणि मेडिकल ची चौकशी करण्यात यावी आणि त्याच्या वर कडक कारवाई करण्यात यावी अन्यथा प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल असे दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

## मराठवाड्यात ओला दुष्काळ जाहीर करा

### शेतकरी व कामगारांना आर्थिक मदत द्या

गेवराई (प्रतिनिधी): गेवराई गोदाकाटाच्या गावाचे व मराठवाड्यामध्ये अतिवृष्टीमुळे भयान नुकसान झाले असून गोदाकाटच्या पुरामुळे अनेक गावांमध्ये पाणी शिरले आहे जमीन खरडून वाहून गेली आहे विद्युत पुरवठा खंडित काही ठिकाणी विद्युत पोल पडले आहेत जनावरे वाहून गेली आहेत घरांचे नुकसान झाले आहे कधी नाही अशी परिस्थिती यावर्षी अतिवृष्टीमुळे निर्माण झाले असून हे भयानक दृश्य दिसत आहे सरकारने वेळ न लावता ओला दुष्काळ जाहीर करावा शेतकऱ्यांना ५० हजार रुपये हेक्टर मदत करावी जो कामगार शेतकऱ्यांच्या जीवावरती अवलंबून आहे त्या कामगारांना आर्थिक मदत करावी कामगारावर सुद्धा उपासमारीची वेळ आली आहे तात्काळ सरकारने वेळ न



लावता सरसकट मदत द्यावी अशी निवेदन रिपाई एकतावादी च्या वतीने गेवराई तहसीलदार यांच्यामार्फत मुख्यमंत्री यांना देण्यात आले यावेळी रिपाई एकतावादीचे मराठवाडा अध्यक्ष मा शैलेंद्र पोटभरे गेवराई तालुका मा हनुमंत काळेबाग तालुका सचिव संभाजी घोडके परळी तालुका कार्याध्यक्ष एकनाथ उजगरे नितीन पोटभरे यांनी दिले.।

## वडवणीत बीड-परळी हायवेवर लहुजी वस्ताद साळवे यांच्या चौकाचे अनावरण



वडवणी (प्रतिनिधी):- वडवणीत बीड परळी हायवे वर ३३ केव्ही समोर क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे यांच्या नावाने नव्याने बांधलेल्या चौकाचे उद्घाटन मातंग समाजाच्या वतीने करण्यात आले.

सविस्तर वृत्त असे की, क्रांतिवीर वस्ताद लहुजी साळवे यांचा जो इतिहास आहे तो समाजाला बऱ्याच ठिकाणी माहीत नाही त्यांच्या इतिहास त्यांनी दाखवलेले धाडस आणि केलेली क्रांती ही नक्कीच बहुजन समाजाला प्रेरणादायी ठरणार आहे. आणि त्यांचे विचार सामान्य माणसापर्यंत रुजवण्यासाठी त्यांच्या चौकाकडे बघून तरुणांनी प्रेरणा घ्यावी आणि त्या मार्गाने मार्गक्रमण करावी यासाठी या चौकाचे अनावरण मातंग समाजाच्या वतीने करण्यात आले आहे. हा क्षण आपल्या सर्वांसाठी खूप प्रेरणादायी आहे. लहुजी वस्ताद साळवे हे केवळ एक महान स्वातंत्र्य सैनिक नव्हते तर एक समाजसुधारक आणि तरूणांचे प्रेरणास्थान होते. त्यांच्या स्मृतीला उजळा देणारा हा चौक आपल्या शहराच्या इतिहासाचा एक महत्त्वाचा भाग बनला आहे. या चौकामुळे नव्या पिढीला त्यांच्या कार्याची आणि विचारांची ओळख होईल हाच केवळ वाहतुकीसाठीचा मार्ग नसून आपल्या इतिहासाची आणि संस्कृतीची साक्ष देणार आहे एक महत्त्वाचा बिंदू आहे. लहुजी वस्ताद साळवे यांच्या कार्याला आणि त्यागाला आमचा मानाचा मुजरा येणाऱ्या काळामध्ये तरुण तरुणी बहुजन समाजातील या चौकाचे महत्व जल सामान्य पर्यंत पटवून देण्यासाठी काम करतील व क्रांतीवीर वस्ताद लहुजी साळवे यांचे विचार तळागाळातील माणसापर्यंत पोहोच करतील हेच या मागाचे उदिष्ट आहे. क्रांतिवीर लहुजी असतात साळवे यांच्यासह सर्वात महापुरुषांचे विचार प्रत्येक तरुणांनी घेतला पाहिजे आणि पुढे गेले पाहिजे.

## सांडस चिंचोली ची माळीणव्हायची सरकारने वाट पाहू नये -नितीन काळे

माजलगाव (प्रतिनिधी):- सतत पडत असणाऱ्या पावसामुळे गेल्या महिनाभरापासून सांडस चिंचोली आणि वसाहत गावचा संपर्क तुटलेला आहे. लोकांना जीव मुठीत धरून आणि रात्र भर जागून दिवस काढावे लागतं आहेत. आणि हे नवीन नाही. १९७२,१९९३,२००६ आणि



आता गावाला पुराचा पूर्ण वेढा आहे, वेळोवेळी पुनर्वसन करा अशी मागणी शासन दरबारी केली आहे, पण सरकार याकडे दुर्लक्ष करत आहे, स्थानिक च्या आमदाराने आणि जिल्हाधिकारी साहेब यांनी गावाची पाहणी केली आहे, गावाला पुनर्वसनाची अत्यंत गरज आहे. आणि ते जर नाही झालं तर एक दिवस सांडस चिंचोली गावाची माळीण होईल ही भीती नाकारता येणार नाही. आज जी गावाची परिस्थिती आहे ती अख्खा महाराष्ट्र पाहतोय. गावाला रस्ता नाही, बस सेवा नाही लाईट नियमित नाही, एवढंच काय तर ज्यांनी पाण्याच्या भीतीपोटी गाव सोडून बाहेर राहण्यासाठी आसरा केलाय त्यांना पक्क्या झढठ नाहीत, त्यामुळे योजना आल्या तरी पडूनच राहतात, सरकारला विनंती आहे, विषय गंभीर आहे, याकडे लक्ष देऊन गावाचं पुनर्वसन करावं अन्यथा एक दिवस सांडस चिंचोली जिल्ह्याच्या नकाशावरून माळीण सारखी गायब होईल, असे मत, आवाहन, विनंती, बहुजन विकास मोर्चा चे प्रसिद्धी प्रमुख नितीन काळे चिंचोलीकर यांनी केली आहे.

## थकीत वेतनासाठी ६ अक्टोबर ला जिल्हा अधिकक्षक कृषी अधिकारी कार्यालय समोर आमरण उपोषण- गणेश थोरात

माजलगाव (प्रतिनिधी):- कृषि अधिकारी कृषि चिकित्सालय फळरोप वाटिका व तालुका बीजगुणन केंद्र येथील दैनंदिन रोजंदारी मंजूरी माहे ऑगस्ट २०२२ ते फेब्रुवारी २०२३ या कालावधीत थकीत मजूरी आज पर्यंत मिळालेली नाही.

तसेच माहे जून २०२४ ते ऑक्टोंबर २०२४ पर्यंत मजूरी सुध्दा आजतागायत मिळालेली नसल्याने येणाऱ्या ६ ऑक्टोबर २०२५ रोजी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी बीड यांच्या कार्यालया समोर आमरण उपोषण करणार असल्याचे गणेश थोरात यांनी दि ११ सप्टेंबर रोजी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे



आम्ही घरामध्ये कर्ता असल्याने कूटूंबाची सर्वस्वी जवाबदारी आमच्यावर आहे. उदा. मुलाबाळाचे शिक्षण, आई-वडिल वयस्कर असल्याने त्यांना वेळोवेळी दवाखाना व औषधी उपचाराची आवश्यकत्ता असते घरामध्ये आडी-आडचणीचा सामना करणे. जिक्रीचे झाले असून आमच्यावर उपाषमारीची वेळ आलेली आहे. तरी विनंती की आमच्या हक्काचे वेतन मिळवून द्यावे या पुर्वी मा. कृषि आयुक्तालय पुणे व मा. विभागीय कृषि सहसंचालक संभाजीनगर, मा. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी बीड, मा. उपविभागीय कृषि अधिकारी माजलगांव तोंडी व लेखी कळवूनही त्यांनी आजतागायत आमच्या थकीत वेतनाबाबत. दखल घेतलेली नाही. तरी आम्ही सर्व मजूराची विनंती की, येणाऱ्या ५ ऑक्टोबर पुर्वी आमची थकीत मजूरी व रेगुलर मजूरी अदा करण्यात यावी नसता आम्ही सर्वजण दि ६ ऑक्टोबर पासून आपल्या कार्यालया समोर आमरण उपोषण करणार आहोत असे गणेश गंगाधर थोरात यांनी ११ सप्टेंबर २०२५ रोजी दिलेल्या निवेदनात म्हंटले आहे निवेदनावर त्यांच्या सह १० ते १२ मजुरांच्या स्वाक्षरी आहेत

## भिंत कोसळून दोन जण जखमी, तालुक्यातील मुडेगांवची घटना



अंबाजोगाई (प्रतिनिधी): अंबाजोगाई तालुक्यातील मुडेगाव येथे एका घराची भिंत कोसळून दोघेजण जखमी झाले आहेत. जखमी मध्ये एक महिला तर एका पुरुषाचा समावेश आहे. मुडेगाव या गावात अंबाबाईचे मंदिर आहे. याच मंदिरात दर्शनासाठी संदीपान अडसूळ आणि शेशाबाई जगताप हे दोन गावकरी दर्शनासाठी जात होते. वाटेतच एक बंद अवस्थेत असलेले दगडी बांधकाम असलेले जुने घर आहे. मागील काही दिवसांपासून अंबाजोगाई तालुक्यात पावसाची संततधार चालू आहे. दररोज पडणाऱ्या पावसाने दगडी बांधकाम असलेले घर कोसळल्या गेले. घराच्या बाजूने जात असताना या घराच्या भिंतीखाली संदीपान अडसूळ हे दबल्या गेले तर शेषाबाई जगताप यांच्या पायावर दगड पडल्याने त्यांच्या पायाला दुखापत झाली. भिंतीखाली दबल्या गेलेले संदीपान अडसूळ हे कमरेपासून खाली भिंतीखाली दबल्या गेले. त्यांच्या अंगावर पडलेले दगड काढताना त्यांना अक्षरशःओढून काढावे लागले. त्यांना तातडीने अंबाजोगाई येथील स्वा.रा.ती. रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले असून त्यांच्यावर पुढील उपचार केले जात आहेत.

## बंडोपंत पत्की यांचे निधन



अंबाजोगाई(प्रतिनिधी): जेष्ठ नागरीक बंडोपंत नारायणराव पत्की यांचे शनिवारी अल्पशाः आजाराने दुःखद निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ८९ वर्षे होते. नृसिहतीर्थ स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर दुपारी अत्यंसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध स्तरातील नागरिक उपस्थित होते.त्यांच्या पश्चात पत्नी,मुली, पुतणे असा परिवार आहे.दिनदयाळ ना.सह. बँकेचे अध्यक्ष ॲड. मकरंद पत्की यांचे ते बंधु होते.

## ह.भ.प. मधुकर महाराज शिंदे यांची बीड जिल्हा समन्वयक पदी नियुक्ती; अनिलदादा जगताप यांच्याकडून सत्कार!

बीड (प्रतिनिधी):- वंदनीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या आशीर्वादाने तसेच महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे, संसदरत्न खासदार डॉ. श्रीकांतजी शिंदे व शिवसेना सचिव संजयजी मोरे यांच्या आदेशानुसार बीड जिल्हा कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. या कार्यकारिणीत ह.भ.प. मधुकर महाराज शिंदे यांची बीड जिल्हा समन्वयक पदी नियुक्ती करण्यात आली. या नियुक्तीनिमित्त शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी मधुकर महाराज यांना आपल्या निवास्थानी आमंत्रित करून त्यांचा हृदय सत्कार केला व मनःपूर्वक अभिनंदन केले.



अनिलदादा जगताप यांनी पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देताना सांगितले की, शिवसेना धर्मवीर आध्यात्मिक सेनेच्या माध्यमातून अध्यात्मिक प्रबोधन, समाजजागृती आणि संत विचारांचा प्रसार होणार आहे. तसेच उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांचे जनहिताचे काम आणि विकासदृष्टी जनतेपर्यंत पोहोचविण्यात ह.भ.प. मधुकर महाराज शिंदे महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. तसेच दरम्यान ह.भ.प. मधुकर महाराज शिंदे आणि विष्णुम्हाराज सुरवशे यांनी नियुक्ती केल्याबद्दल महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे, संसदरत्न खासदार डॉ. श्रीकांतजी शिंदे व शिवसेना सचिव संजयजी मोरे यांच्यासह शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांचे आभार मानले. याप्रसंगी गेन्देव महाराज घरत, ज्ञानेश्वर महाराज घरत, ब्रम्हदेव महाराज जगताप, सदाशिव सुर्वे (विभाग प्रमुख), सुरशे माने(उपतालुका प्रमुख), गणेश भांडवले( शहर प्रमुख), शिवाजी निर्धार (माझी सरपंच), मात्रे सर, बाबुराव सुर्वे, रेवन सुर्वे ( ए.स. टी महामंडाळ), बालासाहेब निर्धार (उपसरपंच), प्रकाश शिंदे, देविदास शिंदे, कृष्णा सुर्वे, दत्ता शिंदे, दिपक शिंदे, अविनाश शिंदे, प्रदिप शिंदे, आकाश जगताप, लक्ष्मीकांत दोडके आणि प्रतिक कांबळे उपस्थित होते.

## मनूर : रेणुका देवीच्या नवरात्र महोत्सवात ग्रामसेवकांकडून फराळ वाटप

माजलगाव (प्रतिनिधी):-मनूर गावात सुरू असलेल्या रेणुका देवीच्या नवरात्र महोत्सवाला भक्तांची मोठी गर्दी होत आहे. मंदिर परिसरात सकाळपासून दर्शनासाठी रांगा लागत असून, उपवास केलेले भाविक दर्शनासाठी येत आहेत. या उपासकांच्या सेवेसाठी गावातील ग्रामसेवकांनी पुढाकार घेत फराळ वाटपाचा उपक्रम सुरू केला आहे.

गेल्या दोन दिवसांपासून हा उपक्रम राबविला जात असून, उपासकांना फराळाचे वाटप केल्याने भक्तांमध्ये समाधानाचे वातावरण



आहे. उपासकांच्या सोयीसाठी आणि त्यांच्या श्रद्धेचा आदर म्हणून ही सेवा सुरू केली. देवीमातेच्या कृपेने हा उपक्रम यशस्वीपणे पार पडत आहे, असे ग्रामसेवकांनी सांगितले. दरम्यान, महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मंदिर परिसरात धार्मिक कार्यक्रम, कीर्तन, भजन तसेच सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. परिसरातील नागरिकांसह बाहेरगावाहून आलेले भाविकही मोठ्या संख्येने उपस्थित राहून देवीचे दर्शन घेत आहेत.

ग्रामसेवकांच्या या पुढाकाराचे ग्रामस्थ आणि भाविकांकडून कौतुक होत असून, हा उपक्रम इतरांसाठी आदर्श ठरेल, अशा भावना व्यक्त होत आहेत.

## अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी सहाय्यक कृषी अधिकाऱ्यांचा मदतीचा निर्णय

दौलावडगाव (प्रतिनिधी):- महाराष्ट्र राज्यात अतिवृष्टी व पुरामुळे शेतकरी बांधवांचे प्रचंड नुकसान झाले आहे. अनेकांच्या शेतमाल, जनावरे व घरे वाहून गेल्याने शेतकऱ्यांचे संसार उद्धस्त झाले आहेत. या गंभीर परिस्थितीत राज्यातील सहाय्यक कृषि अधिकारी संघटनेने एक मोठा निर्णय घेतला आहे.

संघटनेतर्फे जाहीर करण्यात आले की, राज्यातील सर्व सहाय्यक कृषि अधिकारी पूर्वीचे नाव - कृषि सहाय्यक यांनी शेतकरी बांधवांच्या



मदतीसाठी एक दिवसाचे संपूर्ण वेतन स्वेच्छेने द्यायचे ठरविले आहे. संघटनेचे अध्यक्ष दयानंद खामकर, उपाध्यक्ष शिवाजीराव सुंबे महाराष्ट्र राज्य सहाय्यक कृषी अधिकारी संघटणा बीड यांनी सांगितले की,कर्मचारी म्हणून केवळ प्रशासकीय जबाबदारी पार पाडणे पुरेसे नाही, तर शेतकरी बांधवांच्या दुःखामध्ये खऱ्या अर्थाने सहभागी होणे हीच आमची नैतिक जबाबदारी आहे. या निर्णयामुळे प्रशासनासोबतच सामाजिक बांधिलकी जपणारे कर्मचारी म्हणून सहाय्यक कृषि अधिकारींची भूमिका अधोरेखित झाली आहे. या उपक्रमामुळे शेतकरी बांधवांना दिलासा मिळणार आहे.

# ७९ वर्षांपासून मेंगडेवाडीतील ग्रामस्थ रस्त्याच्या प्रतिक्षेत!

## तलावाच्या पाण्यातून जीवघेणा प्रवास; अनेकवेळा मागणी करूनही लोकप्रतिनिधी व प्रशासनाचे दुर्लक्ष – डॉ. ढवळे

पाटोदा (प्रतिनिधी):- देशाला स्वातंत्र्य मिळून नुकतेच ७९ वर्षे पूर्ण झाली. मात्र अजूनही ग्रामीण भागातील अनेक गावे मूलभूत सुविधांपासून वंचित आहेत. पाटोदा तालुक्यातील वाघिरा ग्रामपंचायत अंतर्गत असलेल्या मेंगडेवाडी गावाला आजतागायत डांबरी रस्ता मिळालेला नाही. त्यामुळे येथील ग्रामस्थांना दररोज हाल सहन करावे लागत आहेत.

ग्रामस्थांनी वारंवार लोकप्रतिनिधींपासून मंत्र्यांपर्यंत किमान रस्त्याची तरी सोय करावी अशी मागणी केली. यासाठी त्यांनी जलसमाधी आंदोलन, रास्ता रोको आंदोलन देखील केले. परंतु केवळ आश्वासनांचे गाजर दाखवले गेले. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट असून ते आता मोठ्या आंदोलनाच्या पवित्र्यात आहेत, अशी माहिती सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी दिली.

तलावाच्या सांडव्यातून जीवघेणा प्रवास

मेंगडेवाडी ते वाघिरा या रस्त्याची मागणी अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. रस्ता नसल्याने एस.टी. बससेवा येथे पोहोचत नाही. पावसाळ्यात गावकऱ्यांना दूध-दुभते विक्रीसाठी, बाजारहाट, दवाखाना, तसेच विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी तलावाच्या सांडव्यातून जीवघेणा प्रवास करावा लागतो. पालक दररोज आपल्या लेकरांच्या जीवावर उदार होऊन शाळेत पाठवतात.



ग्रामस्थांचा आवाज रस्त्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात अशी मागणी विष्णु बांगर, मल्हारी आरगुडे, रामेश्वर शिंदे, छत्रभुज रांजवण, राजेभाऊ कदम, जगन्नाथ बोबडे, कृष्णा जगदाळे, श्रीहरी आरगुडे, दिलीप जाधव, यश बांगर आदी ग्रामस्थांनी केली आहे. लवकरच रास्ता रोको आंदोलन अहमदपूर-अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गापासून फक्त ७ किमी अंतरावर असूनही रस्त्याच्या अभावामुळे ९०० लोकसंख्या असलेल्या गावाला दरवर्षी संकटांना सामोरे जावे लागते. १ ते ४ वीपर्यंत शाळा गावात आहे, मात्र पुढील शिक्षणासाठी वाघिरा, लिंबागणेश, भायाळा येथे जाण्यासाठी रस्ताच नाही. त्यामुळे पालक व विद्यार्थी अक्षरशः वेठीस धरले गेले आहेत. लवकरच राष्ट्रीय महामार्गावर रास्ता रोको आंदोलन उभारले जाईल, असा इशारा डॉ. गणेश ढवळे यांनी दिला.

# डा.सारिकाताई क्षिरसागरानी पावसाचे पाणी घरात असल्यामुळे पन्नास घरांना दिली भेट-विनोद हातागळे

## किराणा किटचे केले वाटप



बीड (प्रतिनिधी):- दि.२७ : दिवसभर झालेल्या संततधार पावसामुळे बीड शहरात शनिवारी (दि.२७) सर्वत्र पाणीच पाणी झाले होते. शहरातील नाळवंडी नाका, गांधी नगर, आदित्य कॉलेज परिसर, लोणार पुरा, जुना दगडी पूल आदी भागात पाणी साचून नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागले. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी विविध भागांची पाहणी करून नागरिकांच्या भेटी घेतल्या व त्यांना धीर दिला. त्यांच्या सूचनेनंतर तहसील व नगरपरिषद प्रशासनाने गतीने मदतकार्य पोहोचविले. तसेच, घरांच्या नुकसानीचे पंचनामे सुरू करण्यात आले आहेत.

बीड शहरातील गांधीनगर भागातील अनेक घरात पाणी शिरले. त्याठिकाणी जाऊन डॉ.सारिका क्षीरसागर यांनी नागरिकांची भेट घेतली. त्यांच्या सूचनेवरून तहसील व नगरपरिषद प्रशासनाने तेथील नागरिकांना आदित्य कॉलेज परिसरात सुरक्षितस्थळी स्थलांतरित केले. या नागरिकांच्या निवासासह जेवणाची सोय करण्यात आली त्यांना धनी दिले जाणार आहे. ही कार्यवाही नायब तहसीलदार सुहास हजारे यांच्या पान २ वर...

दुर्दैवी घटना: खिशात चिठ्ठीही आली आढळून

# ओबीसी आरक्षण संपलं: आता पोलीस भरतीत माझी मुलं लागत नाहीत

परळी वैजनाथ (प्रतिनिधी):- आपली दोन मुले पोलीस भरतीची तयारी करत आहेत. मात्र आता आपलं ओबीसीचे आरक्षण संपलं, आपल्या मुलांना नोकरी लागत नाही. त्यांना इतर कामधंदा व्यवसाय टाकून द्यायला आपल्याकडे पैसेही नाही, संपत्तीही नाही, शेतीही नाही आता आपल्या जगण्याला काही अर्थ नाही अशा विवंचनेतून परळी तालुक्यातील टोकवाडी येथील एका ऑटो चालकाने स्वतःच्या राहत्या घरात गळफास घेऊन स्वतःचे जीवन संपवल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. मयताच्या खिशात अशा प्रकारची एक चिठ्ठीही आढळून आली आहे. याबाबत ग्रामीण पोलिसात नोंद करण्यात आली आहे.



याबाबत पोलीस सूत्रांकडून प्राप्त अधिक माहितीनुसार, टोकवाडी येथील ऑटो चालक आत्माराम भांगे हे टोकवाडी -परळी प्रवासी ऑटो चालून आपली उपजीविका भागवत असायचे. त्यांना आदित्य व आदर्श अशी दोन मुले आहेत. या मुलांचे शिक्षण झाल्यानंतर गेल्या दोन वर्षापासून मुले पोलीस भरतीची तयारी करत होते. मात्र गेल्या काही दिवसात ओबीसी आरक्षण संपल्याच्या बातम्या व चर्चांना उधान आले आहे. आपली मुले पोलीस भरतीची तयारी करत असून त्यांना नक्कीच नोकरी लागेल या आशेवर असलेल्या या ऑटोचालकाला आपले ओबीसी आरक्षण संपले या विचाराने ग्रासून टाकले होते. या विचारातूनच गेल्या तीन ते चार पान २ वर...

ना.छगनरावराव भुजबळ साहेब यांच्या उपस्थितीत

# होणारा ओबीसी महाएल्गार मेळावा पुढे ढकलला!-ॲड. सुभाष राऊत

बीड (प्रतिनिधी):- ेबीसी समाजाच्या न्याय हक्कासाठी ओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेते ना. छगनराव भुजबळ साहेब यांच्या उपस्थितीत रविवार दि. २८ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी ४ : ०० वाजता बीड येथे आयोजित ओबीसी महाएल्गार मेळावा पुढे ढकलण्यात आला असून लवकरच पुढील तारीख जाहीर करण्यात येईल असे मेळाव्याचे आयोजक तथा अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस ड. सुभाष राऊत यांनी कळविले आहे.



बीड जिल्ह्यासह महाराष्ट्र राज्यात सर्वत्र अतिवृष्टी होत असून मुसळधार पावसाने नद्यांना पूर आलेला आहे. अनेक पुलावरून पाणी जात असल्याने वाहतूक ठप्प करण्यात आलेली आहे. शेतकऱ्यांच्या शेतात आणि नागरिकांच्या घरात पाणी शिरले असल्याने परिस्थिती अवघड बनली आहे. अशा परिस्थितीत शेतकरी आणि नागरिकांना मदत करणे आपले कर्तव्य असल्याने बीड येथे आयोजित ओबीसी महाएल्गार मेळावा पुढे ढकलून पूरग्रस्त नागरिकांना, शेतकऱ्यांना मदत करावी असे आवाहन ओबीसींचे राष्ट्रीय नेते ना. छगनराव भुजबळ पान २ वर...

# व्यंकटेश पब्लिक स्कूल मधील प्रवेश बदलल्या चा राग मनात ठेऊन टी. सीं देण्यास नकार

माजलगाव (प्रतिनिधी) व्यंकटेश पब्लिक स्कूल, दिंद्रुड येथे शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांच्या संदर्भात शाळेचा मनमानी कारभार सुरू असल्याची तक्रार पालकां मधून पुढे येत आहे.व्यंकटेश पब्लिक स्कूल येथील प्रवेश काढून पालकांने दुसऱ्या शाळे मध्ये प्रवेश घेतल्याचा राग मनात धरून टी. सीं देण्यास नकार दिला जात असून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान करण्यास कारणीभूत ठरलेल्या व्यंकटेश पब्लिक स्कूलवर कार्यवाही करण्यात यावी या मागणीसाठी विद्यार्थ्यांचे पालक जिल्हाधिकारी कार्यालयासमोर कुटुंबासह उपोषण करणार असल्याची खात्रीलाय माहिती मिळत आहे.



दिंद्रुड तालुका माजलगाव येथे खाजगी इंग्लिश स्कूलचे पेव फुटले आहेत जसे जागोजागी टपऱ्या पहावयास मिळतात तशा पद्धतीने इंग्लिश स्कूल थाटलेली दिसत आहेत सदर इंग्लिश स्कूलमध्ये कुठल्याच प्रकारचा शैक्षणिक दर्जा दिसून येत नसून नात्यातील आणि घरचेच दहावी बारावीचे शिक्षक विद्यार्थ्यांना शिकवत असल्यामुळे मुलांच्या बुद्धिमत्तेत उलट घट होत आहे दिंद्रुड मध्ये अनेक जनानीं धंदा करण्यासाठी इंग्लिश स्कूल थाटलेली आहेत आमच्या इंग्लिश स्कूलचे शिक्षण किती दर्जेदार आहे असे दाखवून परिसरातील जनतेची डोनेशनच्या माध्यमातून लूट केली जात आहे त्याचाच प्रत्यय व्यंकटेश पब्लिक स्कूल मध्ये घडताना दिसून आला आमच्यात शाळेचा महागडा ड्रेस, शूज, आमच्याच शाळेची किट, पान २ वर...

# शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी करून हेक्टरी ५० हजार मदत द्यावी – पिनू राजे डांगे यांची मागणी

बीड : जिल्ह्यातील शेतकरी सध्या नैसर्गिक आपत्ती, अतिवृष्टी, अवकाळी पाऊस आणि बाजारभावातील अनिश्चितता यामुळे प्रचंड संकटात सापडले आहेत. शेतकरी वर्गाचं उत्पादन खर्चापेक्षा जास्त नुकसान होत असल्याने ग्रामीण भागात हताशा पसरली आहे. अशा कठीण परिस्थितीत शेतकऱ्यांचा श्वास रोखला जाणार नाही, यासाठी सरकारने तातडीने मदतीचे पाऊल उचलावे, अशी मागणी काँग्रेसचे बीड तालुका सचिव पिनू राजे डांगे यांनी केली आहे. डांगे म्हणाले की, आज शेतकऱ्यांवर कर्जाचे प्रचंड ओझे आहे. हे ओझं हलकं करण्यासाठी सरकारने शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी करावी.



फक्त कर्जमाफीच नव्हे तर शेतकऱ्यांना पुन्हा उभारी मिळावी यासाठी प्रत्येक शेतकऱ्याला हेक्टरी रु. ५० हजार थेट आर्थिक मदत दिली गेली पाहिजे. अन्यथा शेतकरी कर्ज आणि नैराश्याच्या विळख्यातून बाहेर पडणार पान २ वर...

# धोंडराई बसस्थानकात प्रवाशांची गैरसोय; ठिकठिकाणी पावसाचे पाणी साचल्याने करावी लागतेय कसरत

गेवराई (प्रतिनिधी) गेवराई तालुक्यातील धोंडराई सारख्या ग्रामीण भागात शनिवारी सायंकाळी झालेल्या जोरदार मुसळधार पावसामुळे बस स्टँड परिसरातील वसाहतीत व घरामध्ये पाणी शिरले. यामुळे अनेक गोरगरीब कुटुंबियांचे नुकसान झाले.पावसाने पुन्हा एकदा बेजबाबदार कारभाराची पोलखोल केली आहे. अगदी तास भर पाऊस पडला तरी रस्त्यावर पाणीच पाणी साचते आहे. धोंडराई गावात सध्या अशीच अवस्था झाली आहे त्यामुळे आपण गावात राहतो की पाण्यात राहतो असा प्रश्नही अनेक नागरिकांना पडला आहे.



दरम्यान पावसानंतर गावाची काय अवस्था होते याचे एकापाठोपाठ एक अनेक व्हिडिओ सोशल मिडियावर व्हायरल होत असतात. दरम्यान सध्या धोंडराई बसतळ्याचामाफ करा हा, या बसस्थानकाचा व्हिडिओ चर्चेत आला आहे. व्हिडिओ पाहिल्यानंतर तुम्हालाही प्रश्न पडेल की हे बसस्थानक की बसतळे निर्माण झाले आहे.

सविस्तर अधिक माहिती अशी की शुक्रवार व शनिवारी मध्यरात्री जोरदार पाऊस झाला. त्यामुळे बसस्थानकातील खड्ड्यांमध्ये पाणीच पाणी साचले होते. पर्यायाने प्रवाशांना पाणीमय खड्ड्यांतून ये-जा करावी लागली.सध्या मुसळधार पाऊस सुरू आहे. तसेच हवामान पान २ वर...

सरपंच, ग्रामसेवकवर कारवाई करा-डॉ.रंजीत कसबे

# सतत तोंडी पाठपुरावा करून देखील जातीय द्वेष भावनेतून दलित वस्तीतील समस्या कडे ग्राम पंचायतचे दुर्लक्ष



माजलगांव (प्रतिनिधी):- जल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात गाव खेड्यात पाऊसाने थैमान घातले आसुन त्याचा परिणाम शेतीवरील पिकावर व मानवी जिवणावर दिसुन येत आहे त्याचाच भाग म्हणून

माजलगांव परभणी रोड लगतअसणाऱ्या व ग्रुप ग्रामपंचायत शिपे टाकळी येथील दलीत वस्तीचे काही भाग पुनर्वसन होऊन तो कल्याणनगर हा झालेला आसुन कल्याण नगर या ठिकाणी सरपंच व ग्रामसेवक हे गावातील दलीत वस्तीतील जातीय द्वेष भावनेतून प्रत्येक समस्या कडे गांभीर्याने लक्ष देत नाहीत. तोंडी वारंवार पाठपुरावा करून देखील घरासमोरील नाली रस्ता व इतर काही समस्यांचा पाढा वाचून देखील येथील सरपंच, ग्रामसेवक हे जातीय द्वेशातून प्रत्येक समस्येवर वेळ मारून नेण्याचा प्रयत्न करत असतात. ग्रामपंचायतच्या या दूषित कारभारामुळे

ग्रामस्थ हे त्रस्त झालेले असून काही दिवसापूर्वीच डॉ.रंजीत कसबे याची दहा महीन्याची मुलगी आजारी पडली होती ती आजारी पडण्याची कारण म्हणजे नालीतील घान, कचरा व गाळ व त्यातून परलेली दुर्गंधी होय. या परिसरात मोठ्या प्रमाणात मच्छर वाढले आहे. डेंग्यू सारख्या मच्छरचा वावर पण खूप मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे . या वस्तीतील कित्येक जण या दुर्गंधीमुळे आजाराने त्रस्त आहेत. त्यामुळे सर्वसामान्य माणसांना अजून वेगवेगळ्या आजाराचा प्रादुर्भाव होऊ शकतो .या बाबी संबंधितांना सतत तोंडी सांगून पण जातीयद्ववेशातुन या वस्तीकडे जाणीवपूर्वक पान २ वर...

# मराठवाड्यात ओला दुष्काळ जाहीर करा–उपसभापती श्रीहरी नाना मोरे

माजलगाव (प्रतिनिधी):- मराठवाड्यातील आठही जिल्ह्यात मागील २४ तासांपासून ढगफुटी, अतिवृष्टी सारखा पाऊस बरसत असून हा पाऊस थांबत नाही. त्यामुळे मराठवाड्यात ओला दुष्काळ जाहीर करा अशी आग्रही मागणी बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी नाना मोरे यांनी राज्य शासनाकडे केली आहे. मराठवाड्यातील शेतक-यांना निसर्गाच्या लहरीपणामुळे कधी कोरड्या तर कधी ओल्या । दुष्काळाचा सामना करावा लागतो. त्यातच शासनाच्या मनमानी आणि शेतकरी विरोधी धोरणामुळे प्रचंड महागाईचा भस्मासुर वाढतोय. त्या महागाईचे खते, औषधे, बीयाणांची पेरणी करायची आणि ऐनवेळेला हातातोंडाशी आलेला घास हिरावुन न्यायचा या युक्तीप्रमाणे निसर्गाच्या लहरीपणांमुळे मराठवाड्यातील शेतक-यांना त्याचा सामना करावा लागतोय. २००६ च्या नंतर तब्बल १९ वर्षांनी मराठवाड्यात वेळेवर पाउस झाला. शेतक-यांनी आपल्या मुलां बाळांच्या अपेक्षा गरजा बाजुला ठेवुन महागा -मोलाचे बियाणे, खते, औषध घालुन कापुस, उस, सोयाबीनसह इतर पिकांची खरिपात पान २ वर...



# धानोरा रोड नागरिकांच्या संघर्षामुळेच रस्त्यासाठी तीन कोटी मंजूर : सचिन मुळूक

बीड (प्रतिनिधी) गेल्या चाळीस वर्षांपासून खड्ड्यांनी व्यापलेला रस्ता पावसाळ्यात पाण्याने भरलेले खड्डे रोजच्या प्रवासात होणाऱ्या यातना आणि याच रस्त्यावर चालत राहिलेला संघर्ष अखेर आज फळाला आला आहे. धानोरा रोडच्या कामासाठी शासनाकडून तब्बल तीन कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून, हा विजय केवळ धानोरा रोड भागातील नागरिकांच्या सातत्यपूर्ण संघर्षाचा आणि एकजुटीचा आहे, असे शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी सांगितले.



गेल्या चार दशकांपासून धानोरा रोडची दुरवस्था कायम आहे. कित्येकदा डागडुजीच्या नावाखाली थातूरमातूर काम झाले, अनेकदा फक्त उदघाटने झाली. मात्र परिस्थितीत कोणताही बदल झाला नाही. वाहनधारक, विद्यार्थ्यांपासून ते पादचारी नागरिकांपर्यंत प्रत्येकाला या रस्त्यावरून प्रवास करताना अक्षरशः नरकयातना सहन कराव्या लागतात. धानोरा रोड हा नगर रोडशी थेट जोडणारा महत्त्वाचा मार्ग आहे. या रस्त्यामुळे अनेक गावे बीड शहराशी जोडली जातात. या परिसरात शाळा, शासकीय कार्यालये, मंगल कार्यालये आणि व्यावसायिक दुकाने मोठ्या प्रमाणात आहेत. खड्डेमय रस्त्यामुळे व्यवसायांवर परिणाम झाला आहे. धानोरा रोडच्या कामासाठी स्थानिकांनी अनेकवेळा आंदोलने केली. एवढेच नव्हे तर शालेय विद्यार्थ्यांनी पान २ वर...

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT

CMYK